महाराष्ट्र शासन
मत्स्यव्यवसाय विभाग
सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय, रायगड-अलिबाग
तिसरा मजला, सिध्दी अपार्टमेंट, पेण रोड, अलिबाग-४०२ २०१
Phone/ Fax : ०२१४१ २९५२२१
email : acfalibag@gmail.com

जा.क्र.सआम/राय/अं/०४६ /२०२४-२५ दिनांक १४ /०२/२०२५

कार्यालयीन आदेश -

विषय : संयुक्त सागरी व्यवस्थापन अंतर्गत कृत्रिम रीफ संरक्षण व देखभालकरिता मच्छिमार सहकारी संस्थांना निधी उपलब्ध करुन देणेबाबत.

वाचा : जा. क्र. मत्स्य/प्रा.ऊ.म.मुं./तां-०१/३५०/२०२५, दि. ०३/०२/२०२५.

उपरोक्त संदर्भाकीत विषयान्वये लहान मच्छिमारांचे उत्पन्न वाढविणे तसेच किनारपट्टीवरील मत्स्यव्यवसाय पुनरूत्पादन करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनासने प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत नवीन उपघटक "Promotion of sustainable fisheries and livelihoods through Artificial reefs" कार्यक्रम सर्व जिल्हा कार्यालयांमार्फत यशस्वीरित्या राबविण्यात आलेला आहे. केंद्र शासनामार्फत प्राप्त झालेल्या उद्दिष्ट १८२ ठिकाणी कृत्रिम रीफ स्थापन करण्यात आलेले आहेत. त्यापैकी रायगड जिल्ह्याच्या किनारपट्टीवर ४४ कृत्रिम रीफ स्थापना करण्यात आलेल्या आहेत. प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत स्थापित केलेल्या कृत्रिमरीफची देखरेख व संरक्षण होण्याच्या दृष्टीने स्थानिक मच्छीमार सहकारी संस्थांच्या माध्यमातून त्यांच्या कार्यक्षेत्रातील कृत्रिम रीफ संवर्धनासाठी दत्तक देणे व संयुक्त सागरी व्यवस्थापन (Joint Sea Management) अंतर्गत देखभाल निधी देणे प्रस्तावित आहे.

रायगड जिल्ह्याच्या किनारपट्टीवर पुढीलप्रमाणे ४४ कृत्रिम रीफची स्थापना करण्यात आलेली असुन प्रति रीफ रु.१.०० लक्ष याप्रमाणे निधी मच्छिमार सहकारी संस्थाना वितरीत करणेकरीता मान्यता प्रदान करण्यात आली आहे :-

अ.क्र.	संस्था	AR पाखरण संख्या	वितरीत करावयाचा निधी
१	रायगड जिल्हा मच्छिमार संघ, रायगड-अलिबाग	१	१०००००
२	हनुमान मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., एकदरा	१	१०००००
३	महेश्वरी मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., एकदरा	१	१०००००
४	सागरकन्या मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., मुरुड	१	१०००००
५	जय भवानी मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., मुरुड	१	१०००००
६	आदिवासी मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., नांदगाव	१	१०००००
७	बोर्ली मांडला मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., बोर्ली मांडला	५	५०००००
८	शिवस्मृती मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., कोर्लेई	१	१०००००
९	तुळजाभवानी मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., कोर्लेई	१	१०००००

१०	विजय सागर मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., कोर्लेई	१	१०००००
११	श्री महालक्ष्मी मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., राजपुरी	३	३०००००
१२	श्रीराम मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., आदगाव	२	२०००००
१३	श्री पिंपळादेवी मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., भरडखोल	१	१०००००
१४	किनारा मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., भरडखोल	१	१०००००
१५	कोकण मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., श्रीवर्धन	१	१०००००
१६	शिवशक्ती मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., भरडखोल	१	१०००००
१७	माऊलीकृपा मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., दिघी	१	१०००००
१८	एकविरा मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., दिघी	१	१०००००
१९	श्रीकृष्ण मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., जीवनाबंदर	१	१०००००
२०	दर्यासागर मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., चौल, रेवदंडा	१	१०००००
२१	थेरोंडा मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., चौल, थेरोंडा	१	१०००००
२२	श्री गणेश मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., चौल, थेरोंडा	१	१०००००
२३	श्री गणेश मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., साखर	१	१०००००
२४	साखर मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., साखर	१	१०००००
२५	अलिबाग मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., अलिबाग	१	१०००००
२६	श्री मार्तंड वरसोली मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., वरसोली	१	१०००००
२७	थळ मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., थळ	१	१०००००
२८	सासवणे मांडवा मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., सासवणे	१	१०००००
२९	कापरीदेव मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., सासवणे	१	१०००००
३०	मल्हारी मार्तंड मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., रेवस बोडणी	१	१०००००
३१	कल्पवृक्ष मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., रेवस बोडणी	१	१०००००
३२	माता टाकादेवी मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., मांडवा	१	१०००००
	एकुण	३९	३९०००००

<u>सदर निधी वाटपाकरीता अटी व शर्ती :-</u>

१. सर्व मच्छिमार सहकारी संस्थांचे संमतीपत्र, MoU घेणे अनिवार्य.

२. मच्छिमार सहकारी संस्थांच्या बँक खात्यावर फक्त DBT द्वारे निधी वितरीत करणे.

३. मच्छिमार सहकारी संस्थांना कृत्रिम रीफ देखभाल व संरक्षण यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी हा संबंधित बाबींवर कार्यक्षेत्रातील परवाना अधिकारी यांच्या परवानगी शिवाय खर्च करु नये.

४. कृत्रिम रीफ दत्तक घेणाऱ्या संस्थांना दत्तक घेतलेल्या प्रती रीफ करीता रु.१.०० लक्ष या दराने निधी वितरीत करणे.

५. संयुक्त समुद्र व्यवस्थापन (Joint Sea Management) अनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र. मत्स्य/सा/०५३१०१/१४०८/२०२३, दि.०९/०७/२०२४ अन्वये निर्गमीत करण्यात आलेल्या खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वांचे (Guidelines) पालन करणे.

संयुक्त सागरी मत्स्यव्यवस्थापनाचीउदिष्टे :-

१. सागरी मासेमारी चिरकाळ शाश्वत ठेवण्यासाठी शास्त्रोक्त पध्दतीने व्यवस्थापन.
२. नियोजनबद्ध व्यवस्थापनामध्ये अवलंबून असलेल्या ग्रामस्थांचे योगदान घेणे व त्यांच्या उपजिविका साधनांचा विकास करणे.
३. मत्स्यव्यवसाय विभाग व स्थानिक जनता यांच्यातील सहजीवन वाढवून परस्पर सहकार्य वृध्दींगत करणे.
४. त्यासाठी अवलंबितत्व असलेल्या गाव समूह तयार करुन अशा संस्था, शासन व संशोधन संस्था इत्यादीमध्ये करारनामे करणे, सदर क्षेत्राबाबत सूक्ष्म व्यवस्थापन आराखडा (Micro Plan) तयार करणे, सदर समूहांना आवश्यक प्रशिक्षण देणे.
५. योजनेच्या माध्यमातून प्राप्त होणारे उत्पन्न मत्स्यसंवर्धन व सदर समूहाच्या विकासासाठी वापरणे.
६. केंद्र/राज्य शासनाच्या विविध विभागांच्या योजनेतील तरतुदींची सांगड (Convergence) घालणे.

संयुक्त सागरी व्यवस्थापन प्रकल्पाची अंमलबजावणी :-

१. संयुक्त सागरी व्यवस्थापन प्रकल्प व सागरी मत्स्यव्यवसाय संवर्धन सह/व्यवस्थापन समिती आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नियंत्रणाखाली राहील. योजनेचा वार्षिक आराखडा तयार करणे, आवश्यक निधीची मागणी करणे व वितरीत करणे, कामांचे मूल्यमापन करणे, प्रकल्पात आवश्यक बदल असल्यास पूर्व मान्यतेने बदल करणे व त्याबाबत शासनास आवश्यक तो अहवाल सादर करणे, प्रकल्पाचे सर्वसाधारण नियंत्रण करणे इत्यादी बाबी त्यांच्या अधिनस्त राहतील.
२. ज्या गावचे/वस्तीचे क्षेत्रात समुद्र आहे, तेथे सामूहिक स्वरुपाचे फायदे देण्यासाठी मच्छीमार समुह व मच्छीमार सहकारी संस्थाचे बळकटीकरण करुन गरजेनुसार प्रकल्पाची उभारणी करुन सागरी मत्स्यव्यवसाय संवर्धन योजना राबविण्यात येईल. यासाठी संयुक्त व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात येईल. सदर समितीची एक कार्यकारिणी अस्तित्वात राहील.

संयुक्त सागरी व्यवस्थापन समिती :-

१	संबंधित जिल्हयाचे मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी /मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी	अध्यक्ष
२	मच्छिमार संस्थेचे चेअरमन	सदस्य
३	पारंपरिक मच्छिमारांचे प्रतिनिधी	सदस्य
४	गावातील ग्रामसेवक	सदस्य
५	बंदर पर्यवेक्षक	सदस्य
६	सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी (परवाना अधिकारी)	सदस्य सचिव

सदर संयुक्त सागरी व्यवस्थापन समिती शाश्वत मासेमारी व उपजिविका संदर्भात शासनाच्या सागरी मासेमारी/मत्स्योत्पादन वाढविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या खालील विविध

योजनाबाबत जिल्हा मत्स्यव्यवसाय कार्यालय व संबंधित मच्छीमारी गाव/लाभार्थी संस्थामधील संनियंत्रणाचे (दुव्याचे) काम करेल.

१. स्वच्छ सागर निर्मळ सागर.
२. "Promotion of Sustainable Fisheries and Livelihood through Artificial Reefs" च्या द्वारे उभारणी केलेल्या कृत्रिम रीफचे व्यवस्थापन करणे.
३. समुद्री शेवाळ/कालवे व शिंपले पालन.
४. समुद्रामध्ये पिंजऱ्यातील मत्स्यपालन.
५. सी-रेन्चींग (Sea Ranching).
६. समुद्री किनारी मत्स्यपर्यटन विकास.
७. समुद्रात/खाडीत/नदीत किनारी भुत जाळे/प्लास्टीक निर्मूलन.
८. शाश्वत मासेमारी व उपजिविकासंदर्भात योजनेचा प्रचार करणे व जनजागृती करणे.
९. "Climate Resilient Coastal Fisherman Village" साठी विविध योजना सुचविणे.
१०. संरक्षित दुर्मिळ सागरी प्रजातीबाबत जनजागृती.
११. पावसाळी मासेमारी बंदीबाबत जनजागृती.
१२. सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा), २०२१/अवैध मासेमारी पद्धती.

<u>संयुक्त सागरी व्यवस्थापन</u> :-

महाराष्ट्राच्या लगत असलेल्या अरबी समुद्रात संयुक्त मत्स्यव्यवस्थापन उपक्रम राबविण्यात येत आहे. याद्वारे लोकसहभागातून सामुदायिक पद्धतीने मत्स्यसंपदेचे संरक्षण करण्याचा मानस आहे. या संयुक्त सागरी व्यवस्थापनाद्वारे मच्छिमार समुदायाच्या सहभागातून शाश्वत आणि जबाबदार मासेमारीच्या पद्धत्तींचे समर्थन तसेच जबाबदार मासेमारीचा प्रचार करण्यात येईल.

१. संयुक्त सागरी व्यवस्थापनाच्या माध्यमातून पारंपारिक मासेमारी करणाऱ्या व्यक्तीच्या हिताचे संरक्षण करण्याचे आणि शाश्वत मासेमारीसाठी, मासेमारीच्या आकारमानाचे विनियमन करणे, लहान मासे व कोवळे मासे पकडण्याचे टाळणे यांसारख्या उत्तम व्यवस्थापन पद्धतीचा अंगीकार करुन मत्स्यसाठ्याचे संवर्धन करणे अपेक्षित आहे. याद्वारे शासनाने निर्गमित केलेल्या दि.०२/११/२०२३ च्या माशांच्या किमान कायदेशीर आकारमानासंबंधी शासन आदेशाचे पालन करणेबाबत संयुक्त व्यवस्थापन समितीद्वारे महत्त्वपूर्ण प्रयत्न करणे अपेक्षित आहे.
२. सागरी परिसंस्थेमध्ये सोडून देण्यात आलेले, हरवलेले व फेकून देण्यात आलेली मासेमारी जाळी मोठ्या प्रमाणात आढळतात. प्रत्येक वर्षी जगभरात १ लक्ष सागरी सस्तन प्राणी व कासवे तसेच १ दशलक्ष सागरी पक्षी यांचा मृत्यु अश्या मासेमारी जाळ्यांमुळे होतो. मासेमारीसाठी वापरण्यात येणारी जाळी ही अविघटनशील आहेत. सागरी परिसंस्थेमध्ये सोडून देण्यात आलेले, हरवलेले व फेकून देण्यात आलेली जाळी पर्यावरणास अतिशय घातक असतात. या करीता सदरची जाळी समुद्रात सोडून न देणे, अशी समुद्रातून जाळी

बाहेर काढणे, याबाबत मच्छिमारांमध्ये जनजागृती करणे इ. कार्ये संयुक्त सागरी व्यवस्थापनाद्वारे लोकसहभागातून करावयाचे आहे.

३. कृषि व पदुम विभागाच्या दि.२१/१२/२०१८ व दि.०८/०१/२०२१ च्या शासन निर्णयान्वये वन्यजिव संरक्षण कायदा अधिनियम, १९७२ अंतर्गत ऑलिव्ह रिडले कासव, ग्रीन सी कासव, लॉगर हेड कासव, हॉक्सबिल कासव, पॉक्यूपाईन रे (काटदेर पाकट), व्हेल शार्क, गैन्जेटीक शार्क, पाँडेचरी शार्क, सॉ फिश, जेंट गिटार फिश, लेटर बैंक कासव, डॉल्फीन व व्हेल शार्क (सर्व समुद्री सस्तन प्राणी यांस दुर्मिळ प्रजाती म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. या दुर्मिळ प्रजातीचे संरक्षण करणे आवश्यक आहे याकरीता स्थानिक मच्छिमारांच्या सहभागातून दुर्मिळ प्रजातींच्या संरक्षणासाठी पाठींबा प्राप्त करुन घेणे शक्य आहे. याबाबत राज्यातील स्थानिक किनारपट्टीवरील मच्छिमारांच्या संयुक्त सागरी व्यवस्थापनाद्वारे मच्छिमारांमध्ये सकारात्मक चर्चा घडवून सागरी परिसंस्थेचे शाश्वत संतुलन राखणे शक्य होईल. याकरिता प्रयत्न करावेत.

४. शास्त्रीय तत्त्वावर मासेमारीचे नियमन करण्यासाठी आणि मासेमारीचा व्यवसाय करणाऱ्या निरनिराळ्या वर्गातील व्यक्तींच्या आणि विशेषत: पारंपारिक जाळी वापरुन मासेमारीचा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी; मासेमारीवर नियंत्रण ठेवणे यासारख्या उत्तम व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब करुन माशांचे जतन करणे आणि समुद्रावर कायदा व सुव्यवस्था राखणे, यासाठी पर्ससीन जाळी यांचा वापर करण्याऱ्या यांत्रिक तसेच यंत्रचलीत मासेमारी नौकांवर जनरेटर अथवा जनरेटरशिवाय चालणारी विनाशिकारी मासेमारी पध्दती, ज्यात बुल व पेअर ट्रॉलिंगचा समावेश आहे, तसेच पाण्याखाली बुडीत अथवा पाण्याच्या पृष्ठभागावर तरंगते कृत्रिम दिवे/एलईडी लाईट माशांना आकर्षित करणारे दिवे किंवा कोणतीही इतर प्रकाश उत्सर्जित करणारी कृत्रिम साधने/उपकरणे, बसविणे अथवा त्यांच्या कार्यान्वयास शासनाचे दि.२७/०४/२०१८ च्या अधिसूचनेद्वारे प्रतिबंध घालण्यात आला आहे. याबाबत स्थानिक मच्छिमारांच्या संयुक्त सागरी व्यस्थापनांद्वारे नैसर्गिक संसाधन आणि जैवविविधता संवर्धनाद्वारे सागरी उत्पादकता व वाढविणे व नैसर्गिक संसाधने संरक्षित करणे, याकरीता मच्छिमारांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती करावी. यांची उद्दिष्टे प्राप्त करुन घेणेसाठी स्थानिक मच्छिमारांचा सक्रीय सहभाग करून घ्यावा.

५. मासळीच्या साठ्याचे जतन तसेच मच्छिमारांची जिवित व वित्त यांचे रक्षण करण्याच्या हेतूने महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ अन्वये दि.०१ जून ते ३१ जुलै या कालावधीमध्ये राज्याच्या जलधीक्षेत्रात यांत्रिक मारोमारी नौकास पावसाळी मासेमारी बंदी घालण्यात आली आहे. पावसाळी कालावधीत मासळीच्या जिवांना प्रजोत्पादनास पोषक वातावरण असते. या कालावधीत मासेमारी बंदीमुळे मासळीच्या बीजनिर्मिती प्रक्रियेस वाव मिळून मासळीच्या साठ्याचे जतन होते. तसेच याकालावधीत खराब वादळी हवामानामुळे होणारी मच्छिमारांची जिवित व वित्तहानी मासेमारी बंदीमुळे टाळता येणे शक्य होते. मासळीच्या साठ्याचे जतन व मच्छिमारांची जिवित व वित्तहानी मासेमारीबंदीमुळे टाळता येणे शक्य होते. मासळीच्या साठ्याचे जतन व मच्छिमारांची जिवित व वित्तहानी टाळणे

याकरीता संयुक्त सागरी व्यवस्थापन एक महत्वाचे कार्य ठरू शकेल, लोकसहभागातून मासेमारीवर देखरेख आणि पाळत ठेवणे, बेकादेशीर व अवैध तसेच अनुचित व अनियंत्रित मासेमारीचा सामना करण्यासाठी संयुक्त सागरी व्यवस्थापन हे मजबूत प्रणाली ठरु शकेल व याकरिता उपाय योजावेत.

६. संयुक्त सागरी व्यवस्थापनाने स्थानिक मच्छिमार सहकारी संस्थेचा, त्यामधील मच्छिमार सभासद, स्थानिक ग्रामपंचायतीचा सहभाग करुन घ्यावा. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे राज्यातील सागरी जिल्हयांच्या लगत सागरी क्षेत्रात लहान मच्छिमारांचे उत्पन्न वाढविणेसाठी तसेच मत्स्यव्यवसाय पुनरुत्पादन करण्याच्या दृष्टीने १८२ कृत्रिम रीफ स्थापन करण्यात आल्या आहेत. सदरच्या कृत्रिम रीफ टाकल्यानंतर त्याचे संवर्धन, संरक्षण व देखरेख करण्याचे काम संबंधीत मच्छिमार सहकारी संस्थायांचेद्वारे संयुक्त सागरी व्यवस्थापनाद्वारे करण्यात येईल. संबंधित स्थानिक मच्छिमार सहकारी संस्थेस कृत्रिम रीफ दत्तक म्हणून देण्यात येईल. या संयुक्त सागरी व्यवस्थापन समितीने त्यांना प्राधिकृत केलेल्या कृत्रिम रीफची संपूर्ण जबाबदारी घेऊन त्यांचे संवर्धन, संरक्षण व देखरेख करावी. या कृत्रिम रीफच्या परिसरातील ५० मिटरच्या परिक्षेत्रात कोणत्याही मासेमारी नौकेस मासेमारीपासून परावृत्त करावे. याकरीता चारही बाजूस लाईट-बोये लावून इशारे लावण्याची व्यवस्था करावी, याकरीता स्थानिक मच्छिमारांमध्ये जनजागृती करावी. कृत्रिम रीफ ही मासळीसाठी प्रजननाचे क्षेत्र म्हणून संबंधीतानी स्वतःहून घोषित करावे.

७. सागरी परिसंस्थेतील प्लास्टिक प्रदूषण ही अतिशय संवेदनशील बाब आहे. प्लास्टिक जाळे हे अविघटनशील असून यामधून काही कालावधीनंतर बाहेर पडणाऱ्या विषारी घटकांमुळे मोठ्या प्रमाणावर सागरी प्रदूषण होते. सागरी परिसंस्थेमधील संचयन झालेले प्लास्टिक ही जागतिक समस्या झाली आहे. या समस्येमुळे सागरी पर्यावरण व जैवविविधता यावर विपरित परिणाम होत आहे. महाराष्ट्र राज्याच्या समुद्रात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पिशव्या, बाटल्या, प्लास्टिक कचरा इ. आढळून येत आहे. यामुळे सागरी परिसंस्थेतील प्राणी व मासे यांस धोका निर्माण झाला आहे. यासाठी समुद्रात प्लास्टिक कचरा टाकण्यास जनतेस परावृत्त करणे, किनाऱ्यावर आलेला कचरा गोळा करुन त्याची विल्हेवाट लावणे, मासेमारी करतांना जाळ्यात येणाऱ्या प्लास्टिकचे नौकेवर गोळा करुन किनाऱ्यावर एकत्रित करुन त्यांची विल्हेवाट लावणे इत्यादीकरीता मच्छिमारांमध्ये जनजागृतीद्वारे सहभाग करुन त्याची अंमलबजावणी करणे संयुक्त सागरी व्यवस्थापनाद्वारे प्रभावशील कार्य ठरु शकेल. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

८. प्रत्येक कृत्रिम रीफ (Artificial reef) च्या ठिकाणापासून १०० मिटर व्यासाचे अंतर Geo Mapping करून बलून बोयाद्वारे सिमांकित (Demarcation) करावीत व सदर क्षेत्र मरीन बोया रिजर्व पार्क संबोधून ते मासेमारी निषिद्ध क्षेत्र (No Fishing Zone) म्हणून घोषित करण्यात यावे.

९. समुद्रातील संरक्षित दुर्मळ प्रजातीचे संवर्धन, LESS ABUNDANT झालेल्या वाणिज्यिक मत्स्यप्रजातीचे संवर्धन उदा.सिल्वर पापलेट इत्यादी, लोकसहभागातून करण्याच्या दृष्टीने करण्याच्या स्थानिक मच्छीमार सहकारी संस्थांना मरीन बोया रीजर्व पार्कचे व्यवस्थापन क्षेत्र

दत्तक घेण्यास प्रवृत्त करणेबाबतची कार्यवाही करावी. सदर मच्छीमार गावासमोरील जलधीक्षेत्रात असणाऱ्या मरीन रीजर्व पार्क क्षेत्र वगळून उर्वरीत क्षेत्रात संबंधीत असणाऱ्या संस्थेच्या सभासदांना MLS च्या वापर करुन मासेमारीसाठी मुभा राहील.

उपरोक्तप्रमाणे संयुक्त सागरी व्यवस्थापन कृत्रिम रीफचे संरक्षण व देखभालीकरीता संबंधित मच्छीमार सहकारी संस्थांना देण्यात येणारा निधी व याबाबत करावयाच्या संपूर्ण अंमलबजावणीकरीता मा.प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई विभाग, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. मा.प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई विभाग, मुंबई यांनी कार्यालयीन आदेशात नमुद केलेल्या अटी व शर्तीप्रमाणे सदरचा निधी संबंधित मच्छीमार सहकारी संस्था यांना वितरीत करण्यात येत आहे. याबाबत संयुक्त सागरी व्यवस्थापन कामाचा आढावा संबंधित मच्छीमार सहकारी संस्थाकडून दरमहा न चुकता प्रत्येक महिन्याच्या ३ तारखेस आपल्या अभिप्रायासह समिती अध्यक्षांनी या कार्यालयास न चुकता सादर करावा.

(सं.वा.पाटील)
सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तां.)
रायगड-अलिबाग

प्रति,

१. मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, रायगड-अलिबाग
२. सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी (परवाना अधिकारी), अलिबाग/मुरुड /श्रीवर्धन
३. लेखा शाखा, सआम कार्यालय, रायगड-अलिबाग यांना उचित कार्यवाहिस्तव.
४. चेअरमन, रायगड जिल्हा मच्छिमार संघ, रायगड-अलिबाग
५. चेअरमन, हनुमान मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., एकदरा
६. चेअरमन, महेश्वरी मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., एकदरा
७. चेअरमन, सागरकन्या मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., मुरुड
८. चेअरमन, जय भवानी मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., मुरुड
९. चेअरमन, आदिवासी मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., नांदगाव
१०. चेअरमन, बोर्ली मांडला मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., बोर्ली मांडला
११. चेअरमन, शिवस्मृती मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., कोर्लेई
१२. चेअरमन, तुळजाभवानी मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., कोर्लेई
१३. चेअरमन, विजय सागर मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., कोर्लेई
१४. चेअरमन, श्री महालक्ष्मी मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., राजपुरी
१५. चेअरमन, श्रीराम मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., आदगाव
१६. चेअरमन, श्री पिंपळादेवी मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., भरडखोल
१७. चेअरमन, किनारा मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., भरडखोल
१८. चेअरमन, कोकण मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., श्रीवर्धन
१९. चेअरमन, शिवशक्ती मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., भरडखोल

२०.चेअरमन, माऊलीकृपा मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., दिघी
२१.चेअरमन, एकविरा मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., दिघी
२२.चेअरमन, श्रीकृष्ण मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., जीवनाबंदर
२३.चेअरमन, दर्यासागर मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., चौल, रेवदंडा
२४.चेअरमन, थेरोंडा मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., चौल, थेरोंडा
२५.चेअरमन, श्री गणेश मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., चौल, थेरोंडा
२६.चेअरमन, श्री गणेश मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., साखर
२७.चेअरमन, साखर मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., साखर
२८.चेअरमन, अलिबाग मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., अलिबाग
२९.चेअरमन, श्री मार्तंड वरसोली मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., वरसोली
३०.चेअरमन, थळ मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., थळ
३१.चेअरमन, सासवणे मांडवा मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., सासवणे
३२.चेअरमन, कापरीदेव मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., सासवणे
३३.चेअरमन, मल्हारी मार्तंड मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., रेवस बोडणी
३४.चेअरमन, कल्पवृक्ष मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., रेवस बोडणी
३५.चेअरमन, माता टाकादेवी मच्छि.वि.का.सह.संस्था मर्या., मांडवा

प्रत मा.आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर प्रस्तुत.

प्रत मा.प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई विभाग, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर प्रस्तुत.